शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परिपत्रक

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विशिष्ठ विद्याशाखांच्या जलदगती अतिरिक्त तुकड्या मागणी प्रस्तावाबाबत.**

**संदर्भ :- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा संदर्भ क्र.एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४ दि.०४/०७/२०१७ रोजीचा शासन निर्णय.**

**२. या कार्यालयाचे संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/६४४ दि. १९/०७/२०२१ रोजीचे परिपत्रक**

**३. या कार्यालयाचे संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/६४४ दि. १९/०७/२०२१ रोजीचे परिपत्रक**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी उपरोक्त संदर्भान्वये सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन जलदगती अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्याकरिता कार्यपध्दती व निकष विहीत केले आहेत. या शासन निर्णयानुसार महाविद्यालयाने प्रस्ताव सादर करण्याकरिता सुचना खालीलप्रमाणे आहेत.

१. संलग्न पारंपारिक महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विशिष्ठ विद्याशाखांच्या जलदगती अतिरिक्त तुकड्या मागणी प्रस्ताव शासनाच्या दि.०४/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **"परिशिष्ट -अ"** मधील अर्जाच्या नमुन्यात विद्यापीठाकडे सादर करताना **"परिशिष्ट-ब"** मध्ये नमुद केलेली कागदपत्रे अर्जासोबत जोडून सदर शासन निर्णयामधील **"परिशिष्ट क"** मधील माहिती महाविद्यालयाने विद्यापीठाच्या खात्यावर भरून शुल्क रू.४,०००/- सह विद्यापीठास **दि.१७/०८/२०२१** पर्यंत कार्यालयीन वेळेपुर्वी दोन प्रतीत पोस्टाव्दारे सादर करावेत.

२. महाविद्यालयाने आवश्यक असणाऱ्या सर्व विशिष्ठ विद्याशाखांच्या जलदगती अतिरिक्त तुकडी मागणीबाबतचे प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह एकाच वेळी सादर करावेत.

३. प्रस्ताव सादर करताना दि.०४/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या नमुन्यातच **त्रुटी विरहीत** सादर करावेत. त्यामध्ये कोणताही बदल न करता महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सही शिक्क्यानिशी सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी Plain Paper वापरावा (महाविद्यालयाचे Letter Head वापरू नये.)

४. एकाच शहरात/गावात एकापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर नजिकच्या महाविद्यालयाचे ना-हरकत पत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. प्रस्ताव व शुल्क एकाच वेळी कार्यालयीन मुदतीमध्ये पोस्टाव्दारे जमा करावेत.

६. सद्यस्थितीत शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य साथरोग प्रतिबंधक कायदा १८८७ दि.१२.०३.२०२० पासून लागू केला आहे. याअनुषंगाने राज्यसरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाविद्यालयांनी अंतिम मुदतीपुर्वी सर्व प्रस्ताव विद्यापीठास By Post सादर करुन सहकार्य करावे.

७. अपुरे अथवा विलंबाने आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

८. उपरोक्त प्रस्तावांचे शुल्क सद्यस्थितीत विद्यापीठाच्या संकेतस्थळावरती Quick Link मेनूमधील Online Payment Gate Way या Link मधून General Receipt या Drop Down Manu मध्ये नोंदणी करुन User ID व Password तयार करुन जलदगती अतिरिक्त तुक ड्या मागणी प्रस्तावाबाबत शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. तसेच सदर बाबत काही अडचणी उद्भवल्यास विद्यापीठाशी संपर्क साधावा.

डॉ. विलास डी.नांदवडेकर
(कुलसचिव )

**संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/** 656
**दिनांक :** 13 AUG 2021
**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**विद्यापीठ संलग्नित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये**

G:\23.04.2021\sm\2022-23\Temp Division1 2019-20.doc